मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी नव्या वाहनांची खरेदी

## शासनाच्या आदेशाला फाटा? आर्थिक अडचणीत असतानाही अलिशान वाहन खरेदीवर नागरिकांकडून नाराजी

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या आदेशानुसार महापालिकेच्या अ, ब आणि क वर्ग महापालिकेच्या महापौरांना वाहन (मोटार कार) खरेदीसाठी 20 लाख रुपयांची मर्यादा आहेत. तर, आयुक्तांसाठी वाहन खरेदीसाठी 15 लाख रुपयांची खर्चाची मर्यादा आहे. असे असतानाही खर्चाची मर्यादा ओलांडून महापौरासाठी 30 लाख रुपयांची तर, आयुक्तांसाठी 19 लाख रुपयांची अलिशान वाहन थेट पद्धतीने खरेदी करण्यात आले आहे. या अनावश्यक उधळपट्टीवरुन शहरवासीयांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.



शासनाने महापौरांना वाहन खरेदी करण्यासाठी जुलै 2020 मध्ये शासन आदेश काढला आहे. त्यामध्ये अ, ब आणि क वर्ग महापालिकांच्या महापौरांना वाहन खरेदी करण्यासाठी 20 लाख रुपयांची मर्यादा घालण्यात आली आहे. तर, महापालिका आयुक्तांना वाहन खरेदी करण्यासाठी 17 सप्टेंबर 2025 च्या शासन आदेशानुसार 15 लाख रुपयांची मर्यादा आहे. मात्र, या शासन आदेशाला फाटा देत, खर्चाच्या मर्यादा ओलांडत अधिक किमतीची अलिशान वाहने खरेदी करण्यात आली आहेत.

महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईस आलेली आहे. महापालिकेवर तब्बल 4 हजार 500 कोटी रुपयांचे दायित्व आहे. मोठ्या प्रकल्पाचा खर्च भागविण्यासाठी कर्ज काढण्याचा खटाटोप केला जात आहे. सध्याची वाहने सुस्थितीत आहेत. अशा परिस्थितीत अधिक किमतीच्या अलिशान वाहन खरेदी करण्यात आल्याने शहरवासीयांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनीं खर्चावर नियंत्रण आणत, बचतीसाठी काटकसरीचे धोरण जाहीर केले होते. यामध्ये अनावश्यक खर्चाला कात्री लावणे, नवीन योजनांना स्थगिती देणे. प्रशासकीय खर्च मर्यादित ठेवण्याचे आदेश त्यांनी सर्व विभागप्रमुखांना दिले होते. मात्र, आयुक्तांनी आपलचा निर्णय फिरवत मर्यादेपेक्षा अधिक खर्च करत काटकसरीच्या धोरणास सोईस्कररित्या बाजूला सारले असल्याचे दिसत आहे.

महापालिका प्रशासनाने पाच वर्षापूर्वी एप्रिल 2021 ला महापौरांसाठी 19 लाख 91 हजार 579 रुपयांचे वाहन खरेदी केले होते. उमहापौरासाठी देखील 16 जून 2016 ला 19 लाख 95 हजार 67 रुपये खर्च खरून वाहन खरेदी करण्यात आले होते. महापौरांचे वाहन केवळ पाच वर्षे जुने आहे. असे असताना आता पुन्हा त्यांच्यासाठी 30 लाख रुपये खर्च करून नवीन वाहन खरेदी करण्यात आले आहे.

### शासन आदेशानुसार वाहन खरेदीचा वादा

**» महापालिकेच्या अधिकाऱ्यांसाठी वाहन खरेदी करण्यासाठी राज्य शासनाचा 2025 मधील नवीन आदेश आहे. त्यामध्ये वाहन खर्चाची मर्यादा वाढवण्यात आली आहे. पदाधिकाऱ्यांसाठी याबाबत सुधारित आदेश नाही. जुन्या शासनाच्या जुन्या आदेशामध्ये महापौरांना 20 लाख रुपयांची मर्यादा आहे. अधिकाऱ्यांच्या नवीन शासन आदेशानुसार 20 टक्के वाढ गृहीत धरली आहे. त्यानुसार, ही वाहने खरेदी केली आहे, असा दावा महापालिकेच्या कार्यशाळेचे कार्यकारी अभियंता कैलास दिवेकर यांनी केला आहे.**

# शाळा व महाविद्यालय परिसरातील अनधिकृत टपऱ्यांवर महापालिकेची कारवाई

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि शैक्षणिक वातावरण अबाधित ठेवण्यासाठी विशेष मोहीम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांच्या परिसरातील अनधिकृत टपऱ्या, पानटपऱ्या आणि तत्सम अतिक्रमणांवर विशे ष कारवाई करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच शैक्षणिक संस्थांच्या परिसरात स्वच्छ, सुरक्षित आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली



या मोहिमेदरम्यान मोरवाडी, आकुर्डी, चिंचवड, जाधववाडी, भोसरी, इंद्रायणीनगर, खराळवाडी, लांडेवाडी, दापोडी, जुनी सांगवी, थेरगाव आदी परिसरातील विविध शाळा आणि महाविद्यालयांच्या आजूबाजूला उभारण्यात आलेल्या अनधिकृत टपऱ्यांची पाहणी करण्यात आली. कारवाईदरम्यान एकूण ३५ अनधिकृत टपऱ्या हटविण्यात आल्या, तर अनेक टपरीधारकांनी कारवाईची सूचना मिळताच स्वतःहून अतिक्रमणे काढून घेतली. त्यामुळे परिसरातील अनधिकृत व्यावसायिक उपक्रमांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यात यश आले.

सदर कारवाई ही केवळ अतिक्रमण निर्मूलनापुरती मर्यादित नसून सार्वजनिक आरोग्य आणि तंबाखूमुक्त वातावरण निर्मितीच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे. महाराष्ट्र शासनाने शासकीय, निमशासकीय तसेच सार्वजनिक ठिकाणे तंबाखूमुक्त ठेवण्याबाबत वेळोवेळी निर्देश जारी केले आहेत. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शाळा व महाविद्यालय परिसरातील अतिक्रमणे, अनधिकृत व्यावसायिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोहोचविणाऱ्या बाबींवर नियमितपणे लक्ष ठेवण्यात येत असून अशा कारवाया यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहेत.

> **"विद्यार्थ्यांचे सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरण राखणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे. शाळा व महाविद्यालय परिसरातील अनधिकृत टपऱ्या आणि अतिक्रमणे हटविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून अशा कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहतील. विद्यार्थ्यांच्या हिताशी तडजोड होणार नाही यासाठी सर्व संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत."**
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# पिंपरी-चिंचवडकरांच्या पाण्याच्या हक्कासाठी आमदार अमित गोरखे मैदानात

## तारांकित प्रश्नाद्वारे वेधले सरकारचे लक्ष, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे दोन नव्या निविदांद्वारे काम पूर्ण करण्याचे आश्वासन

**पिंपरी | प्रतिनिधी**

भामा-आसखेड धरणातून पिंपरी-चिंचवड शहराला १६७ एमएलडी अतिरिक्त पाणी मिळवून देणाऱ्या महत्त्वाकांक्षी जलवाहिनी प्रकल्पाच्या विलंबाबाबत भाजपचे आमदार अमित गोरखे यांनी चालू विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला. शहराचा पाण्याचा प्रश्न तातडीने सुटावा आणि प्रकल्पात चालढकल करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, या मागणीसाठी आमदार गोरखे यांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यांच्या या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जुन्या वादग्रस्त ठेकेदाराला हटवून आता दोन नव्या निविदा काढून युद्धपातळीवर काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे




आमदार अमित गोरखे यांनी अधिवेशनात अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. पिंपरी-चिंचवडकरांना हक्काचे पाणी मिळवून देणारा भामा-आसखेड प्रकल्प वेळेत का पूर्ण झाला नाही? तसेच काम रखडवणाऱ्या आणि काळ्या यादीत नाव असलेल्या ठेकेदारालाच पुन्हा काम दिले गेले आहे काय? असा थेट सवाल आमदार अमित गोरखे यांनी विचारला होता. यावर उपमुख्यमंत्र्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करत 'काळ्या यादीतील ठेकेदाराला पुन्हा काम दिलेले नाही' असे स्पष्ट केले. तसेच, प्रकल्पाचा विलंब टाळण्यासाठी आणि काम तातडीने पूर्ण करण्यासाठी जुन्या कंत्राटदारावरील कारवाईनंतर आता नवीन पारदर्शक पद्धतीने दोन वेगवेगळ्या निविदा प्रक्रिया राबवण्यात येत असल्याची अधिकृत माहिती शासनाने दिली.

### शासनाने जाहीर केलेली नवी रुपरेषा

» शहरातील ४९४ सोसायट्यांपैकी ३६९ सोसायट्यांमधील एसटीपी चालू आहेत. १२५ सोसायट्यांमधील एसटीपी बंद आहेत. सोसायट्यांमधील एसटीपी चालू आहेत की नाही यावर निगराणी ठेवावी. एसटीपीतील पाणी वाहने धुने, उद्यानासाठी वापरण्याकरिता नागरिकांना प्रोत्साहित करावे. जुन्या सोसायट्यांना एसटीपी उभारणे शक्य नाही. तिथे महापालिकेने लहान एसीटीपी उभारण्याचा प्रयत्न करावा, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली.

“ पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार वेगाने होत असून नागरिकांना मुबलक पाणी मिळणे हा त्यांचा हक्क आहे. भामा-आसखेड प्रकल्पाच्या कामात झालेला विलंब अजिबात खपवून घेतला जाणार नाही. यापूर्वी ज्यांनी कामात हलगर्जीपणा केला, त्यांच्यावर कारवाईची मागणी मी लावून धरली होती. आता शासनाने नवीन कंत्राटदारांमार्फत ९ ते १० महिन्यांची कडक मुदत देऊन काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रशासनाने दिलेल्या या मुदतीत काम पूर्ण करून घेण्यासाठी आणि पिंपरी-चिंचवडकरांच्या घराघरात पाणी पोहोचेपर्यंत माझा हा पाठपुरावा अविरत सुरूच राहील.

\- अमित गोरखे, आमदार

# चार तासांच्या अथक प्रयत्नानंतर विहिरीत पडलेल्या श्वानाची अग्निशमन पथकाकडून सुखरूप सुटका

## चिखली मोरेवस्तीतील थरारक बचावकार्य; नागरिकांकडून अग्निशमन जवानांचे टाळ्यांच्या कडकडाटात कौतुक

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली-अग्निशमन विभागाच्या जवानांनी चिखली मोरेवस्ती परिसरात एका खोल विहिरीत पडलेल्या श्वानाची अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत तब्बल चार ते पाच तासांच्या अथक प्रयत्नानंतर सुखरूप सुटका केली. या धाडसी व कौशल्यपूर्ण बचाव मोहिमेबद्दल घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी अग्निशमन पथकाचे टाळ्यांच्या कडकडाटात अभिनंदन केले.

आज सकाळी ९ वाजून १५ मिनिटांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन नियंत्रण कक्षास चिखली मोरेवस्ती परिसरातील एका खोल विहिरीमध्ये श्वान पडल्याबाबत बचाववर्दी प्राप्त झाली. घटनेची तात्काळ दखल घेत मुख्य अग्निशमन नियंत्रण कक्षामार्फत कुदळवाडी येथील आग वर्दीवरून श्वान बचाव मोहिमेसाठी तळवडे अग्निशमन पथकास घटनास्थळी रवाना करण्यात आले.



घटनास्थळी पोहोचल्यानंतर तळवडे अग्निशमन पथक प्रमुखांनी परिस्थितीचा सखोल आढावा घेतला. विहीर खोल असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी व कचरा साचलेला होता. तसेच विहिरीच्या सभोवताली मोठ्या प्रमाणात दाट काटेरी झाडेझुडपे असल्यामुळे बचाव कार्यात अडथळे निर्माण होत होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्य अग्निशमन केंद्रातून अतिरिक्त मनुष्यबळ व आवश्यक बचाव साहित्य मागविण्यात आले.

अग्निशमन पथकाने एक्स्टेन्शन लॅडर, रेस्क्यू रोप व रेस्क्यू हार्नेसच्या सहाय्याने अत्यंत सावधगिरीने विहिरीमध्ये उतरून बचाव मोहीम सुरू केली. विहिरीचे कठडे जुने व कमकुवत झालेले असल्याने तसेच विहीर वापरात नसल्याने अतिरिक्त धोका निर्माण झाला होता. त्याचवेळी बचाव कार्य पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. गर्दीमुळे विहिरीच्या कडेजवळील दगड, फांद्या व काचेचे तुकडे विहिरीत पडत असल्याने परिस्थिती अधिक आव्हानात्मक झाली होती.

विहिरीत अडकलेला श्वान भुकेमुळे व भीतीमुळे अत्यंत अस्वस्थ झाला होता. स्वसंरक्षणाच्या भावनेतून तो वारंवार हालचाल करत असल्यामुळे अग्निशमन जवानांना त्याचा सुरक्षित बचाव करण्यास अडचणी येत होत्या.

सदर बचाव मोहिमेदरम्यान नवनियुक्त तरुण अग्निशामक जवान श्वानाच्या बचावासाठी सातत्याने प्रयत्न करत होते. मात्र अशा प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीतील बचाव मोहिमांचा अनुभव लक्षात घेता तसेच जवानांच्या तांत्रिक कौशल्यात वाढ व्हावी व त्यांचे मनोबल उंचावावे या उद्देशाने अग्निशमन केंद्र अधिकारी श्री. ऋषिकांत चिपाडे यांनी स्वतः विहिरीमध्ये उतरून बचाव कार्याची सूत्रे हाती घेतली.

श्री. चिपाडे यांनी श्वानाचा स्वभाव, त्याची मानसिक अवस्था व भीतीची परिस्थिती लक्षात घेऊन अत्यंत संयमाने त्याला विश्वासात घेत बचाव कार्य सुरू केले. स्वतःची सुरक्षितता लक्षात घेत अग्निशमन जवानांनी कौशल्यपूर्ण पद्धतीने तसेच स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने पुढील बचाव कार्य सुरू ठेवले.

बचाव मोहिमेदरम्यान विहिरीच्या मध्यभागी असताना श्वान वारंवार गोल फिरून जवानांना चकवा देत होता. त्यामुळे बचाव कार्यास विलंब होत होता. मात्र अग्निशमन पथकाने कोणतीही घाई न करता अत्यंत दक्षतेने अखेर श्वानाला सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढून मुक्त केले.

या संपूर्ण बचाव कार्यासाठी अग्निशमन पथकाला सलग चार ते पाच तास अथक परिश्रम घ्यावे लागले. प्रतिकूल परिस्थितीत जीव धोक्यात घालून केलेल्या या कार्याबद्दल नागरिकांनी अग्निशमन जवानांचे कौतुक करत टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले.

"आपत्ती कोणतीही असो, मानवी जीवासोबतच मुक्या जीवांचे रक्षण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशमन विभाग सदैव तत्पर आहे," हे या बचाव मोहिमेतून पुन्हा अधोरेखित झाले.

# काहीही करा पण पाण्यासाठी वणवण थांबवा!

## कमी दाबाने होणारा पुरवठा आणि अचानक बदललेल्या वेळापत्रकामुळे पुणेकर हैराण; महापालिका मुख्य सभेत सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आक्रमक.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील पाणी संकट दिवसेंदिवस गंभीर होत असून, दुसरीकडे महापालिकेचे नियोजन कोलमडल्याने नागरिकांना दोन-दोन दिवस पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. अनेक भागांत कमी दाबाने पाणी येत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही दाद मिळत नसल्याची नाराजी नगरसेवकांनी व्यक्त केली. याशिवाय खासगी टँकरचालकांनी पाण्याचे दर वाढविल्याने आणि वेळेवर टँकर उपलब्ध होत नसल्याने नागरिकांवर पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली आहे.

त्यामुळे काहीही करा; पण नागरिकांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवा, अशी आर्त मागणी नगरसेवकांनी महापालिकेच्या मुख्य सभेत केली. सभागृहात नगरसेवकांकडून कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, पूर्वसूचना न देता बदललेले वेळापत्रक, टँकर उपलब्ध न होणे, अत्यल्प वेळ पाणीपुरवठा होणे, तसेच समाविष्ट गावांतील नागरिकांनाही टँकरचे पाणी पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याच्या तक्रारी करण्यात आल्या. या वेळी झालेल्या चर्चेत माजी महापौर दत्ता धनकवडे यांनी पाणी बंदच्या दिवशीही काही सोसायट्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार केली.

नगरसेविका प्रिया गदादे आणि जयप्रकाश पुरोहित यांनी झोपडपट्टी भागातील नागरिकांची घरे लहान असल्याने पाणी साठवण्याची अडचण लक्षात घेऊन त्या भागात दररोज पाणीपुरवठा करण्याची मागणी केली. ज्या भागांत दूषित पाणी येत आहे, त्या भागांना अतिरिक्त पाणीपुरवठा करावा, अशी मागणी माजी महापौर वैशाली बनकर, तसेच शिवसेना ठाकरे गटाचे पक्षनेते नितीन गायकवाड यांनी केली. पेठ परिसरात पाणीपुरवठा विस्कळीत असून, त्या ठिकाणी टँकरही पोहोचत नसल्याने स्वतंत्र पाणी व्यवस्थेची आवश्यकता असल्याचे सभागृह नेते गणेश बिडकर यांनी सांगितले.



### झोपडपट्टी व दूषित पाणीग्रस्त भागांसाठी विशेष मागणी

» महापालिकेच्या मुख्य सभेत झोपडपट्टी आणि दूषित पाणीपुरवठा होत असलेल्या भागांबाबत विशेष चर्चा झाली. झोपडपट्टीतील घरांची जागा मर्यादित असल्याने पाणी साठवून ठेवणे शक्य नसते. त्यामुळे या भागांना दररोज पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली. तसेच ज्या भागांत दूषित किंवा गढूळ पाणी येत आहे, त्या ठिकाणी अतिरिक्त आणि स्वच्छ पाणीपुरवठा करण्याची मागणी नगरसेवकांनी केली. पेठ परिसरात टँकरही वेळेवर पोहोचत नसल्याने स्वतंत्र पाणीपुरवठा यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे मतही सभागृहात व्यक्त करण्यात आले.

### पाणीटंचाईमुळे नागरिक हैराण

» शहरातील अनेक भागांमध्ये दोन-दोन दिवस पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, बदलते वेळापत्रक आणि अपुरा पाणीसाठा यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांच्या कुटुंबांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पाणीपुरवठा विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे महापालिकेने तातडीने प्रभावी नियोजन करून नियमित आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी विविध भागांतील नागरिकांकडून होत आहे.

### टँकरदरवाढीचा नागरिकांना फटका

» पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर खासगी टँकरची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या संधीचा फायदा घेत काही टँकरचालकांनी दर वाढवल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अनेक ठिकाणी वेळेवर टँकर उपलब्ध होत नसल्याने सोसायट्या आणि नागरिकांना अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. काही भागांत टँकरसाठी अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याने पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. टँकर व्यवसायावर नियंत्रण ठेवण्यासाठी दर निश्चित करणे, नोंदणी व्यवस्था मजबूत करणे आणि नागरिकांना पारदर्शक सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याची मागणी नगरसेवकांनी सभागृहात केली.

---

# महामार्गांवरील 121 ब्लॅक स्पॉटची पाहणी; अपघात रोखण्यासाठी आरटीओची विशेष मोहीम

## पुणे जिल्ह्यातील पाच प्रमुख मार्गांवर संयुक्त तपासणी; 25 जूनपर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

महामार्गांवर सातत्याने होणाऱ्या जीवघेण्या अपघातांची मालिका थांबवण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) जिल्ह्यातील वेगवेगळ्या ५ प्रमुख मार्गांवर निश्चित केलेल्या तब्बल १२१ ब्लॅक स्पॉटची (अपघातप्रवण क्षेत्रे) तातडीने संयुक्त पाहणी करण्यात येणार आहे. या पाहणीसाठी विशेष रस्ता सुरक्षा पथके नियुक्त केली असून, त्यांना २५ जूनपर्यंत आपला एकत्रित अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.




जिल्हाधिकारी आणि जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी हे आदेश काढले आहेत. या मोहिमेत आरटीओ, पोलिस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एनएचएआय, पीएमसी, पीसीएमसी, एमएसआरडीसी आणि एमएसआयडीसी या सर्व यंत्रणांचे प्रतिनिधी संयुक्तपणे काम करणार आहेत.

या सर्व नियुक्त पथकांमधील अधिकाऱ्यांना पोलिस उपअधीक्षक (जिल्हा वाहतूक शाखा, पुणे ग्रामीण) यांच्याशी समन्वय साधून थेट घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करण्याचे आणि अपघातांची कारणे शोधून त्यावर तात्पुरत्या व कायमस्वरूपी उपाययोजना सुचवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

> “ पुणे जिल्ह्यातील महामार्गांवरील अपघातांचे प्रमाण आणि त्यात जाणारे निष्पाप नागरिकांचे बळी ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. फक्त दंडात्मक कारवाई करून अपघात थांबणार नाहीत, तर अपघातांच्या मूळ कारणांचा शोध घेणे गरजेचे आहे. यासाठी आम्ही महामार्गांवरील १२१ ब्लॅक स्पॉट निश्चित केले आहेत. आमची विशेष रस्ता सुरक्षा पथके प्रत्यक्ष रस्त्यांची रचना, तेथील त्रुटी, दिशादर्शक फलकांचा अभाव आणि वाहतुकीची स्थिती याचा बारकाईने अभ्यास करतील. पोलिस आणि पीडब्ल्यूडीसारख्या सर्व संबंधित यंत्रणांना सोबत घेऊन २५ जूनपर्यंत हा अहवाल पूर्ण केला जाईल आणि त्यानुसार तातडीने सुधारणात्मक उपाययोजना राबवल्या जातील. रस्ते सुरक्षित करणे आणि अपघात शून्यावर आणणे हेच मुख्य उद्दिष्ट आहे.
>
> \- स्वप्नील भोसले, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

# विमान निर्मितीत पुण्याची आगेकूच! जगातील आघाडीच्या कंपनीकडून 1400 कोटींची गुंतवणूक

## कंपनीने भारतातील पहिले अभियांत्रिकी उत्कृष्टता केंद्र पुण्यात सुरू केले असून, याद्वारे उत्पादनांची रचना (डिझाईन) केली जाणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

विमानातील अंतर्गत भागांची निर्मिती करणारी जागतिक पातळीवरील जॅमको इंटेरिअर्स कंपनी भारतात पुढील काही वर्षांत १५ कोटी डॉलरची (सुमारे १४०० कोटी रुपये) गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. कंपनीकडून भारतात प्रामुख्याने अभियांत्रिकी क्षमतांचा विस्तार केला जाणार असून, पुरवठा साखळी उभारण्यावर भर दिला जाणार आहे, अशी माहिती कंपनीच्या कार्यकारी अध्यक्षा व मुख्याधिकारी केट शेफर यांनी सोमवारी दिली.

जॅमको इंटेरिअर्सने भारतातील पहिले अभियांत्रिकी उत्कृष्टता केंद्र पुण्यात सुरू केले. या केंद्राच्या उद्घाटनावेळी शेफर बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, या केंद्रात उत्पादनांची रचना केली जाणार आहे. विमानातील अंतर्गत भाग अतिशय गुंतागुंतीचे असतात. सध्या जपानमध्ये हे काम कंपनी करते. आता भारतात विस्ताराचे पाऊल कंपनीने उचलले आहे. भारतात अभियांत्रिकी गुणवत्ता मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे आम्ही पुण्यासह बंगळुरूची उत्कृष्टता केंद्रासाठी निवड केली आहे. बंगळुरूतील केंद्रही लवकरच सुरू होईल.

भारतात विस्तारासाठी कंपनीने पुढील काही वर्षांत १५ कोटी डॉलरच्या गुंतवणुकीची योजना आखली आहे. भारतातील उत्कृष्टता केंद्रात पहिल्या टप्प्यात शंभरहून अधिक अभियंते कार्यरत आहेत. त्यांची संख्या पुढील काळात ५०० पर्यंत नेण्यात येईल. भारतात पुरवठा साखळीचा विस्तार करण्याचे पाऊल कंपनीने उचलले आहे. भारतात उपलब्ध असलेली अभियांत्रिकी गुणवत्ता आणि निर्मिती क्षमता या गोष्टी आमच्यासाठी महत्वाच्या आहेत. पुण्यातील उत्कृष्टता केंद्राच्या माध्यमातून उत्पादनाच्या रचनेपासून विकासाची सर्व कामे होतील, असे शेफर यांनी स्पष्ट केले.

जामको इंटिरिअर्सचे मुख्य परिचालन अधिकारी संजीव सेन म्हणाले की, भारताच्या विमान वाहतूक उद्योगाच्या विकासाचा पुढील टप्पा केवळ विमानांच्या मागणीवर अथवा प्रवासी संख्येवर अवलंबून राहणार नाही, तर जागतिक दर्जाच्या अभियांत्रिकी क्षमता निर्माण करण्यावर ठरेल. पुण्यातील उत्कृष्टता केंद्र हे भारतात उच्च-तंत्रज्ञान क्षमता, संपूर्ण अभियांत्रिकी मालकी आणि जागतिक दर्जाचे नवोपक्रम विकसित करण्याच्या आमच्या दीर्घकालीन दृष्टीकोनाचा महत्त्वाचा भाग आहे.

जपान, अमेरिका, फ्रान्स, इटली, जर्मनी, संयुक्त अरब अमिराती, फिलिपाइन्स आणि सिंगापूरमध्ये उपस्थिती असलेल्या जॅमको इंटिरिअर्सच्या जागतिक नेटवर्कमध्ये पुणे आता एक विकसित अभियांत्रिकी केंद्र म्हणून सामील झाले आहे. या केंद्रातून एफएए, ईएएसए आणि डीजीसीएच्या आंतरराष्ट्रीय मानकांनुसार काम केले जाणार असून, महाराष्ट्रातील पुढील पिढीतील हवाई वाहतूक क्षेत्रातील अभियंत्यांना जागतिक विमानन क्षेत्रात नेतृत्व करण्याची संधी मिळणार आहे.



### पुणे बनणार जागतिक विमानन अभियांत्रिकी हब

**» जॅमको इंटेरिअर्सच्या जागतिक नेटवर्कमध्ये आता पुण्याचा समावेश झाला आहे. जपान, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटली, सिंगापूर आणि यूएईसह विविध देशांमध्ये कार्यरत असलेल्या कंपनीसाठी पुणे हे महत्त्वाचे अभियांत्रिकी केंद्र ठरणार आहे. एफएए, ईएएसए आणि डीजीसीएच्या आंतरराष्ट्रीय मानकांनुसार येथे काम केले जाईल. यामुळे महाराष्ट्रातील तरुण अभियंत्यांना जागतिक विमानन उद्योगात काम करण्याची आणि नेतृत्व करण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.**

### ५०० अभियंत्यांना संधी

**» जागतिक विमान अंतर्गत भाग निर्मिती क्षेत्रातील आघाडीची जॅमको इंटेरिअर्स कंपनी भारतात पुढील काही वर्षांत १५ कोटी डॉलर (सुमारे १४०० कोटी रुपये) गुंतवणूक करणार आहे. पुण्यात सुरू झालेल्या अभियांत्रिकी उत्कृष्टता केंद्रात सध्या १०० हून अधिक अभियंते कार्यरत असून भविष्यात ही संख्या ५०० पर्यंत वाढविण्यात येणार आहे. उत्पादन डिझाइन, संशोधन आणि विकासाची कामे या केंद्रातून केली जाणार आहेत. भारतातील उच्च दर्जाची अभियांत्रिकी कौशल्ये आणि तांत्रिक मनुष्यबळ लक्षात घेऊन कंपनीने विस्तारासाठी पुण्याची निवड केली आहे.**

### बोइंग आणि एअरबससाठी जॅमकोची उत्पादने

**» जॅमको इंटेरिअर्स ही जगातील प्रमुख विमान कंपन्यांना विमानातील अंतर्गत सुविधा पुरवणारी अग्रगण्य कंपनी आहे. बोइंग ७८७ आणि बोइंग ७७७ विमानांमधील बहुतांश स्वच्छतागृहे जॅमकोकडून तयार केली जातात. तसेच बोइंग ७८७ आणि एअरबस ए-३५० विमानांमधील गॅली (छोटे स्वयंपाकघर) पुरवण्यामध्येही कंपनी अग्रस्थानी आहे. पुण्यातील नवीन केंद्रामुळे या उत्पादनांच्या डिझाइन, अभियांत्रिकी आणि नवोपक्रम प्रक्रियेला अधिक वेग मिळणार असून भारताची विमानन क्षेत्रातील भूमिका अधिक मजबूत होणार आहे.**

---

# बारामतीत पाणीटंचाई; दोन दिवसाआड पाणी

## बारामती शहराला आता दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय बारामती नगरपरिषदेने घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाने ओढ दिल्याने नीरा डावा कालव्याचे आवर्तन बंद करण्यात आले आहे. त्यामुळे बारामती शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय बारामती नगरपरिषदेने घेतला आहे. या निर्णयाची मंगळवारपासून (२३ जून) अंमलबजावणी सुरू करण्यात आली. बारामतीला नीरा डावा कालवा हा पाण्याचा मुख्य स्त्रोत आहे. या कालव्यातून मिळणारे पाणी पाटसरोड आणि जळोची येथील तलावात साठवले जाते.

पाटसरोड जलशुद्धीकरण केंद्र आणि सायली हिल जलशुद्धीकरण केंद्राद्वारे शहराला पाणी पुरवठा केला जातो. शहराच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेत यापूर्वी भिमा नदीवरून उजनी धरणातील पाणी भिगवण जवळून बारामतीला आणण्याची योजना हाती घेण्यात आली. या योजनेद्वारे काही काळ बारामतीला पाणीपुरवठा करण्यात येत होता. मात्र, या योजनेचा खर्च अधिक असल्याने या योजनेद्वारे पाणीपुरवठा बंद करण्यात आला.

आता पावसाने ओढ दिल्याने नीरा डावा कालव्याचे आवर्तन बंद करावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर बारामती शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याबाबतचा निर्णय बारामती नगरपरिषदेला घ्यावा लागला आहे. या निर्णयाची मंगळवारपासून (२३ जून) अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.



### पाणीपुरवठा व्यवस्थेवर ताण

**» पावसाने अपेक्षित हजेरी न लावल्याने नीरा डावा कालव्याचे आवर्तन बंद करण्यात आले आहे. त्यामुळे बारामती शहराच्या पाणीपुरवठ्यावर ताण निर्माण झाला असून नगरपरिषदेला दोन दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय घ्यावा लागला आहे. मंगळवारपासून या नव्या वेळापत्रकाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. बारामतीला मुख्यत्वे नीरा डावा कालवा हा पाण्याचा स्रोत असून, त्यातील पाणी पाटसरोड आणि जळोची तलावात साठवून जलशुद्धीकरण केंद्रांमार्फत शहराला पुरवले जाते. सध्याच्या परिस्थितीत उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे.**